—: <u>प्रेस नोट</u> :— दिनांक : ०७/०५/२०१९

यातील लोकसेवक यांनी फिर्यादी यांचे सामान असलेल्या गोडावुनवर कारवाई न करण्यासाठी रु. ६,००,०००/ रकमेच्या लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. ३,००,०००/— रक्कमेच्या लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्यामुळे मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन गुन्हा दाखल.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १८/२०१९ |
| कलम | कलम ७, १२ भ्र. प्र. अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) मो. अलिम शेखलाल तांबोळी, वय ५१ वर्षे, धंदा—मुकादम,<br>२) दिलीप रघुनाथ पाटील, वय ४७ वर्षे, धंदा— कनिष्ठ अभियंता (दोघेही नेमणुकीस इमारत व कारखाने विभाग, पी/नॉर्थ वॉर्ड, मालाड (प), बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई.) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ६,००,,०००/— |
| तडजोडी अंती स्विकारण्याचे मान्य केलेली रक्कम | रु. ३,००,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांचा चित्रपटाच्या शुटींगसाठी लागणारे साहित्य भाडयाने देण्याचा व्यवसाय आहे. व्यवसायासाठी लागणारे सामान ठेवण्यासाठी त्यांनी मालाड परिसरात गोडावुन भाडयाने घेतले आहे. सदर गोडावुनवर कारवाई न करण्याकरीता यातील आलोसे यांनी फिर्यादीकडे रु. ६,००,०००/— इतक्या रकमेच्या लाचेची मागणी केली होती.<br><br>फिर्यादी यांची लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग या कार्यालयात दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक ०६/०२/२०१९ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान आलोसे क्र. १ यांनी फिर्यादी यांचे सामान असलेल्या गोडावुनवर कारवाई न करण्यासाठी फिर्यादी यांच्याकडे रु. ६,००,०००/— रकमेच्या लाचेची मागणी करुन तडजोडी अंती रु. ३,००,०००/— लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. तसेच लाचेच्या मागणीवेळी आलोसे क्र. २ यांनी आलोसे क्र. १ यांना सदरचा गुन्हा करण्यासाठी प्रोत्साहन दिले म्हणुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.**

**<u>संपर्क</u> : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ३०.**
**संकेतस्थळ — acbmaharashtra.gov.in**
**ईमेल : (1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन - www.acbmaharashtra.net**
**टोल फ्री क्र. १०६४**
**दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,**
**व्हॉट्स ॲप क्रमांक —९९३०९९७७००**

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सत्यमेव जयते

(एस. चांदेकर)
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
अतिरिक्त कार्यभार
लाचलुचपत प्रतिबधंक विभाग,
मुंबई विभाग.

Scanned by CamScanner